MHCH060020772025

संक्षिप्त फौजदारी खटला क्र.१५३१/२०२५
सरकार –वि– सिमा विलास गज्ञमवार
निशाणी क्र. ०६ वर

## न्यायनिर्णय
**(आज दिनांक ०३ ऑगस्ट २०२६ रोजी घोषीत)**

अभियोग पक्षाचे कथन व अभिलेखावरील कागदोपत्री पुरावा विचारात घेता खालील मुद्दे विचारार्थ उपस्थित होतात, त्यांचा कारणांसह निष्कर्ष मी खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अभियोग पक्ष असे सिध्द करतो काय की, दिनांक १२/०८/२०२५ रोजी १८:०० ते १८:४० वाजेच्या दरम्यान, संतोषी माता वॉर्ड, बल्लारपुर, ता. बल्लारपूर, जिल्हा – चंद्रपूर येथे आरोपी हा त्याच्या ताब्यात विनापरवाना व बेकायदेशीररित्या एकुण १९ नग प्रत्येकी ९० मीली 'रॉकेट संत्रा' कंपनीची देशी दारु चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने, बाळगतांना मिळून आले ? | **नकारार्थी** |
| २ | आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## कारणमिमांसा

२) आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्याकरीता अभियोगपक्षाने केवळ राजु बबन राठोड **(साक्षीदार क्र.१)** व बदन परसादी वर्मा **(साक्षीदार क्र.२)** या पंच साक्षीदारांना तपासले. पुरेशी संधी देउन देखिल अभियोग पक्ष त्यांच्या इतर साक्षीदारांची उपस्थीती संपादीत करु शकला नसल्याने निशाणी क्र.१ वर आदेश

पारीत करुन अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. खटला चालवित असतांना आरोपींविरूध्द गुन्ह्या संदर्भात कोणतीही विधाने आलेली नसल्यामुळे फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ३१३ प्रमाणे आरोपींची जबानी नोंदविण्यात आली नाही.

**<u>मुद्दा क्र.१ करीताः</u>–**

३) अभियोग पक्षाने आरोपीविरूध्द महाराष्ट्र दारु प्रतिबंधक कायदाकलम ६५ (ई) प्रमाणे आरोप सिध्द करण्यासाठी, आरोपी स्वतःच्या फायदयासाठी अथवा विक्रीसाठी देशी दारु विनापरवाना जवळ बाळगतांना मिळून आले, ही बाब सिध्द करणे आवश्यक आहे.

४) त्या अनुशंगाने अभियोग पक्षाने राजु बबन राठोड (साक्षीदार क्र.१) व बदन परसादी वर्मा (साक्षीदार क्र.२) यांची साक्ष नोंदविली. त्याने त्याच्या पुराव्यात असे नमुद केले आहे की दिनांक १२/०८/२०२५ रोजी बल्लारपूर पोलिसांनी त्याला पंचनाम्याकामी कोठेही बोलाविले नव्हते. बल्लारपूर पोलिसांनी त्याच्यासमक्ष कुठलाही घटनास्थळ पंचनामा तयार केलेला नसून त्याच्यासमक्ष काहीएक जप्त केलेले नाही. सदर साक्षीदारास अभियोग पक्षाने उत्तरसुचक प्रश्न विचारून उलटतपास घेतला, परंतु त्याने खटल्याच्या संदर्भात कोणतीही महत्वपूर्ण माहिती दिली नाही. त्यामूळे सदर साक्षीदारांची साक्ष आरोपीविरुध्दचे आरोप सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षास मदत करत नाही. तसेच सदर प्रकरणातील दुसरा पंच साक्षीदार याने अभियोग पक्षास सहकार्य न केल्याने अभियोग पक्षाने त्याला न तपासता मुक्त केले. त्यामुळे सदर साक्षीदाराची साक्ष नोंदविता आली नाही.

५) अभियोग पक्षाने तपासी अंमलदार व इतर साक्षीदारांची साक्ष

नोंदविली नसल्यामुळे फिर्याद, छापील पहिली खबर व घटनास्थळ जप्ती पंचनामा सिध्द होवु शकला नाही. सदर प्रकरणात रासायनिक विश्लेषणाचा अहवाल दाखल असला तरी तो अहवाल जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालाबाबतचा आहे, तसेच नमुन्यासाठी जप्त मुद्देमालापैकी वेगळा काढण्यात आला होता, इत्यादी बाबी सांगणारा कोणत्याही साक्षीदाराची साक्ष नोंदविण्यात आलेली नाही. सी.ए. सॅम्पल काढून चंद्रपूर येथील न्यायवैदयक प्रयोगशाळा येथे सिल करून सुरक्षितपणे पोहचविले याबाबतचा कुठलाही पुरावा अभिलेखावर अभियोग पक्षाने आणलेला नाही. अभियोग पक्षाने ठाणा मोहरीलयास तपासले नाही व मुद्देमाल ठाणा मोहरील यांच्या ताब्यात दिल्याबाबतचे स्टेशन डायरीमधील व संबंधीत रजिस्टरमधील नोंद सिध्द केली नाही. सबब, जप्त करण्यात आलेला मुद्देमाल हा घटनास्थळावरून जप्त करण्यात आला, ही बाब पुराव्या अभावी सिध्द होवू शकली नाही.

६) त्यामुळे संचीकेवरील एकंदरीत पुराव्यात अवलोकन करता अभियोग पक्षाने आरोपीविरूध्दचा महाराष्ट्र प्रतिबंधक कायदा कलम ६५ (ई) चा गुन्हा आरोपीने केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केलेले नाही, या निष्कर्शावर मी पोहोचलो आहे. करीता मी मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

<u>**मुद्दा क्रं.२ करीता–**</u>

७) वरील मुदयांचा नकारार्थी निष्कर्श पाहता आरोपी ही ठेवलेल्या आरोपामधुन निर्दोश मुक्त होण्यास पात्र आहे. वरील सर्व कारणांचा विचार करता, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. आरोपी **सिमा विलास गज्जमवार** यांना महाराष्ट्र प्रतिबंधक कायदा कलम ६५ (ई) अन्वयेच्या दोषारोपातून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५ (१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. जप्त मुद्देमाल एकुण १९ नग प्रत्येकी ९० मिली 'रॉकेट संत्रा' कंपनीची देशी दारु अपिल कालावधीनंतर राज्य उत्पादन शुल्क विभाग चंद्रपूर यांच्याकडे विल्हेवाट लावण्याकरीता पाठविण्यात यावी.

३. आरोपीचे वैयक्तीक बंधपत्र रद्द करण्यात येते.

४. आरोपी हा अपील दाखल झाल्यास, अपील न्यायालयासमोर हजर राहील, याकरीता त्याने फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ४३७–अ प्रमाणे अपील कालावधीपर्यंत रुपये १५०००/– किंमतीचा वैयक्तीक जात मुचलका सादर करावा.

५. न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by SONIYA NARENDRA SAWALESHWARKAR
Date: 2026.08.03 16:51:33 +0530

(**श्रीमती एस.एन. सावळेश्वरकर**)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
बल्लारपूर.

स्थळः बल्लारपूर
दिनांकः ०३/०८/२०२६